सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - १ यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१

दुरध्वनी क्र. ०२२-२५२२९३०३
Email ID-dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com

प्रेस नोट

(दि. २८/१०/२०२६)
(गोवंडी पोलीस ठाणे)

कर्तव्य बजावणा-या शासकिय रुग्नालयातील कर्मचा-यास मारहान करणा-या आरोपीतास शिक्षा

दिनांक २८/१०/२०२६ रोजी मा. अति सत्र न्यायालय, कोर्ट क्रंमाक २३ मुंबई यांनी गोवंडी पोलीस ठाणे गु.र.नं. ३५/२०१८ कलम ३५३, ३३२, ३२४, ५०४, ३४ भा.दं.वि. सह महाराष्ट्र वैद्यकिय सेवा व्यक्ती व संस्था अधिनियम २०१० प्रमाणे गुन्ह्यातील आरोपी नामे आकाश संतोष साळवे मुंबई यास दोषसिध्दीअंती विविध कलमान्वये शिक्षा सुनावली.

दिनांक १४ /०२/२०१८ रोजी फिर्यादी स्वप्निल रमेश पवार हे शताब्दी हॉस्पिटल, गोवंडी मुंबई येथे एक्स रे टेक्निशिअन म्हणुन लोकसेवक म्हणुन कर्तव्य पार पाडत असतांना यातील आरोपी आकाश साळवे याने कामात अडथळा आणुन फिर्यादीवर पाईपद्वारे हमला केला, त्यामुळे फिर्यादी यांच्या डोळ्याजवळ दुखापत झाली म्हणुन फिर्यादी यांनी गोवंडी पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.नं. ३५/२०१८ कलम ३५३,३३२,३२४, ५०४, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्यात दिनांक २८/१०/२०२६ रोजी मा. अति सत्र न्यायालय, कोर्ट क्रंमाक २३ मुंबई यांनी आरोपी आकाश संतोष साळवे यास कलम ३५३, ३३२ भा.दं.वि. अन्वये एकुण २४२ दिवस कैदेची शिक्षा तसेच ५००० रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिने कैदेची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणामध्ये तपास अधिकारी सपोनि दत्तात्रय शिवराम डफळ यांनी केलेला सखोल तपास, शास्त्रीय व प्रभावी तपास, सबळ पुराव्यांचे संकलन व त्याचे योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण, तसेच सरकारी अभियोक्ता श्रीमती रत्नावली पाटील व पैरवी अधिकारी पोउपनि अजय यादव यांनी मा.न्यायालयासमोर प्रभावी सादरीकरण करणे, सदर प्रकरणाचे न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी मपोउपनि रुपाली सपकाळ यांनी सरकारी पक्षाशी योग्य समन्वय साधणे तसेच सातत्यपुर्व व परिणामकारक पैरवी करणे यामुळे आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयाचा फायदा न देता सिध्द होवुन त्यास मा.न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. सह पोलीस आयुक्त का. व सु. श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनजंय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त चेंबुर विभाग रामराव ढिकले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दयानंद जाधव, सपोनि दत्तात्रेय डपळ, पोउपनि अजय यादव, मपोउपनि रुपाली सकपाळ, पोहवा ज्ञानेश्वर राठोड, मपोहवा जयश्री खरात यांनी केली आहे.

* * *

कर्तव्य बजावणाऱ्या शासकीय रुग्णालयातील कर्मचाऱ्यास मारहाण करणाऱ्या आरोपीस २४२ दिवसांच्या कैदेची शिक्षा